NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प्रवेश सूचना

## एम.फिल. व पीएच.डी. विशेष प्रवेश प्रक्रिया- २०१८-१९

(फक्त राखीव प्रवर्गातील रिक्त जागांकरिता)

शिवाजी विद्यापीठामार्फत एम.फिल व पीएच.डी. विशेष प्रवेश प्रकियेकरिता **राखीव प्रवर्गातील** पात्र विद्यार्थ्याकडून ऑनलाईन अर्ज मागणी करणेत येत आहेत. सदर प्रवेश प्रक्रिया **University Grants Commission (Minimum Standards and Procedure for Award of M.PHIL./PH.D. Degrees) Regulations, 2016** नुसार राबविण्यात येणार आहे. सदर नियमावली, विद्यापीठाची प्रवेश क्षमता, परीक्षा केंद्र व माहिती पुस्तिका विद्यापीठ संकेतस्थळ www.unishivaji.ac.in मध्ये **"M.Phil./ Ph.D. Special Admission Drive- 2018-19"** या लिंकवर उपलब्ध आहेत.

ऑनलाईन अर्ज संबंधित विद्यार्थ्याने सर्व सूचनांचे काटेकोर पालन करून भरावा. भरलेल्या अर्जामध्ये काही तांत्रिक दुरूस्त्या असतील तर त्या mphilphd@unishivaji.ac.in या ईमेलवर दि. 05/05/2019 पूर्वी कळविण्याचे आहेत. त्यानंतर प्राप्त झालेल्या दुरूस्त्यांचा विचार केला जाणार नाही.

**1. ऑनलाईन अर्ज दि. 25/04/2019 दु. 12 पासून ते 04/05/2019 सायं. 06.00 वाजेपर्यंत.**

**2. प्रवेश परिक्षा दि. 21/05/2019, 22/05/2019 व 23/05 /2019. (प्रवेश परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक तसेच हॉल तिकीट विद्यापीठाच्या संकेतस्थळावर तसेच विद्यार्थ्यांना डाऊनलोडिंग करीता नंतर उपलब्ध करण्यात येईल.)**

**3. प्रवेश परीक्षा केंद्रः– शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**

**महत्वाच्या सूचना :–**

- **सदर प्रवेश प्रक्रिया फक्त राखीव प्रवर्गातील रिक्त जागांसाठी आहे. प्रवर्गनिहाय उपलब्ध जागा विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. तरी विद्यार्थ्यांनी प्रवर्गनिहाय उपलब्ध जागा लक्षात घेवून त्याप्रमाणे अर्ज करावेत.**
- **विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षेबाबतच्या अटी व तरतुदी काळजीपूर्वक वाचणे आवश्यक आहे.**
- एम.फिल./पीएच.डी. प्रवेश प्रकिया प्रवेश परीक्षेच्या निकषाद्वारे करण्यात येईल.
- प्रवेश परिक्षेतून सुट मिळणेबाबतचे निकष **RRD 2.5** व **RRD 2.6** नुसार राहतील. सदर नियमानुसार GATE / UGC JRF / SRF पात्र विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असणारा प्रवेश प्रकिया ऑनलाईन अर्ज / नावनोंदणी ऑनलाईन अर्ज भरणे बंधनकारक आहे.
- संवर्गनिहाय सामाजिक आरक्षण व अपंग आरक्षण महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार/तरतुदीनुसार लागू राहिल.
- विद्यापीठाच्या **www.unishivaji.ac.in** या संकेतस्थळावर एम.फिल. व पीएच.डी. अभ्यासकमासाठी प्रवेश क्षमता असणा–या विषयांची यादी व अन्य सविस्तर माहिती उपलब्ध असणार आहे.
- ज्या विषयांसाठी प्रवेश क्षमता आहे अशाच विषयांकरीता विद्यार्थ्यांनी अर्ज भरावा. प्रवेश क्षमता नसलेल्या विषयासाठी अर्ज व प्रवेश परीक्षा शुल्क भरल्यास त्यास विद्यापीठ कार्यालय जबाबदार राहणार नाही अथवा याबाबत तकारी/पत्र स्वीकारले जाणार नाहीत.
- एम.फिल./पीएच.डी. करीता विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी नियमानुसार व संबंधीत अभ्यासकमाच्या प्रवेश पात्रतेच्या निकषानुसार करण्यात येईल.
- विद्यार्थ्यांकरीता ऑनलाईन अर्ज web link **http://online.unishivaji.ac.in** वर उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षेकरीता अर्ज ऑनलाईन माध्यमातून दि. 25/04/2019 रोजी दुपारी 12.00 पासून दि. 04/05/2019 रोजी सायंकाळी 6.00 वा. पर्यंत भरावयाचे आहेत.
- **विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जाची प्रत विद्यापीठास पाठवू नये.**
- एम.फील./पीएच.डी परीक्षेकरिता रुपये 600/– (Non Refundable) इतके शुल्क भरण्याकरिता पेमेंट गेटवे सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. शुल्क भरण्याबाबत Confirmation झाल्याशिवाय अर्जाचा विचार केला जाणार नाही.
- प्रवेश परीक्षेसाठी एकदा भरलेले शुल्क परत केले जाणार नाही.
- ज्या विषयाकरीता प्रवेश क्षमता जाहीर केली आहे. त्याच विषयाची प्रवेश परीक्षा आयोजित केली जाईल याची नोंद घ्यावी.
- प्रवेश पात्रतेच्या अटींच्या अधिन राहून ज्या विद्यार्थ्यांना एकापेक्षा अधिक विषयांच्या प्रवेश परीक्षेकरिता अर्ज करावयाचा आहे, अशा विषयांचे अर्ज स्वतंत्र भरावेत. तसेच प्रत्येक विषयाकरिता स्वतंत्र शुल्क भरावे.
- अपुरे शुल्काचे अर्ज / विनाशुल्क अर्ज ग्राहय धरले जाणार नाहीत.
- एम.फिल., पीएच.डी. अभ्यासकमाच्या प्रवेश परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक विद्यापीठाच्या उपरोक्त संकेतस्थळावर वेळोवेळी जाहीर करण्यात येईल. तसेच परीक्षा विषयक इतर आवश्यक माहिती विद्यापीठाच्या उपरोक्त संकेतस्थळावर स्वतंत्रपणे वेळोवेळी जाहीर करण्यात येईल. तेंव्हा सर्व संबंधितांनी सदर माहिती संकेतस्थळावरून उपलब्ध करून घ्यावी.
- **प्रत्येक विषयासाठी 100 गुणांची प्रवेश परीक्षा (Multiple Choice Based) ऑफलाईन (ओएमआर शीटव्दारे) घेतली जाईल. प्रवेश परीक्षेमध्ये पात्र होणेकरीता कमीत कमी 50 गुण प्राप्त करणे आवश्यक आहे व अंतिम गुणवत्ता यादी नुसार पात्र परीक्षार्थींना प्रवेश दिला जाईल. प्रवेश परीक्षेकरीता Negative Marking system** असणार नाही.
- **उत्तरपत्रिका ओ.एम.आर. शिट या प्रकारची असेल. त्याकरीता Black Ball Point Pen चा वापर करणे बंधनकारक आहे.**
- **प्रवेश परीक्षेकरीता Research Methodology वर आधारीत 50 गुणांची परीक्षा व पदव्युत्तर विषयास अनुसरून 50 गुणांची परीक्षा याप्रमाणे अभ्यासकम राहील. सदर अभ्यासकम वेबसाईट वर उपलब्ध आहे.**
- अर्ज भरताना तांत्रिक अडचणी आल्यास सदर अर्जाबाबत संगणक केंद्राच्या **0231–2609096** तसेच अन्य माहितीकरिता विद्यापीठाच्या पी.जी. बीयुटीआर विभागातील **0231–2609139** या कमांकावर संपर्क साधावा अथवा mphilphd@unishivaji.ac.in या मेलवर कळविण्यात यावे.

स्थळ : कोल्हापूर

दिनांक. / /2019

कुलसचिव